# घोषणा

शासनाकडून सन २०१३ पासून शासकीय तंत्र निकेतन तसेच शासकीय महाविद्यालयातील रिक्त जागांवरील पदे भरण्याकरीता प्राप्त मागणीपत्रांच्या अनुषंगाने आयोगाकडून जाहिराती प्रसिध्द करुन पदे भरण्यासंदर्भातील पुढील कार्यवाही चालू होती. तथापि, दरम्यानच्या काळात विज्ञापित पदसंख्येत बदल होण्याची शक्यता असल्याने खालील पदांची शिफारस तूर्तास करण्यात येवू नये असे शासनाने कळविल्यामुळे निकालाची पुढील प्रक्रिया आयोगाकडून प्रलंबित ठेवण्यात आली.

| अ.क्र. | शासकीय तंत्र निकेतन मधील पदे | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील पदे |
|---|---|---|
| १ | अधिव्याख्याता अणुवद्यिुत अभियांत्रिकी, | सहायक प्राध्यापक(असुधारित), यंत्र अभियांत्रिकी, सुधारित सहयोगी प्राध्यापक |
| २ | अधिव्याख्याता भौतिकशास्त्र | अधिव्याख्याता (असुधारित), विद्युत अभियांत्रिकी |
| ३ | अधिव्याख्याता रसायनशास्त्र | अधिव्याख्याता (असुधारित), उपकरणीकरण |
| ४ | अधिव्याख्याता यंत्र अभियांत्रिकी | अधिव्याख्याता (असुधारित), माहिती तंत्रज्ञान |
| ५ | अधिव्याख्याता हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी | अधिव्याख्याता (असुधारित), अणुविद्युत |
| ६ | अधिव्याख्याता मुद्रण तंत्रशास्त्र् | अधिव्याख्याता (असुधारित), रसायनशास्त्र |
| ७ | अधिव्याख्याता गणित | अधिव्याख्याता (असुधारित), पदार्थविज्ञान |
| ८ | अधिव्याख्याता स्थापत्य अभियांत्रिकी | अधिव्याख्याता (असुधारित), गणित |
| ९ | अधिव्याख्याता धातूशास्त्र अभियांत्रिकी | सहायक प्राध्यापक औषधनिर्माणशास्त्र |

आता शासनाने अभियांत्रिकी महाविद्यालयातील काही पदांचा निकाल जाहिर करण्याबाबत कळविले असून त्यामध्ये त्या त्या पदांच्या मागणीपत्रात पुर्वी कळविलेल्या पदसंख्येत बदल करुन सुधारित पदसंख्ये नूसार निकाल जाहिर करण्याची सूचना केली आहे त्यानुसार आयोगाकडुन निकालाबाबतची अंतिम कार्यवाही करण्यात येत असून लवकरच उमेदवारांच्या शिफारशी शासनाकडे करण्यात येतील.

उर्वरित विषयांकरीता सुधारित पदसंख्येसह निकाल जाहिर करण्याच्या सूचना शासनाकडून जशा जशा शासनाकडून प्राप्त होतील त्या प्रमाणे आयोगाकडून निकाल जाहिर करुन शिफारशी करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

सं. पां. देशमुख
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

दिनांक ०८ डिसेंबर २०१५